नांदेड जिल्ह्यातील बिलोली व देगलूर तालुक्यातील अतिवृष्टी/पुरामुळे बाधित होऊन पुनर्वसित झालेल्या गावांतील नागरी सुविधा कामांसाठी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग
शासन निर्णय क्रमांक: अर्थसं-२०२६/प्र.क्र.८०(ई-१६७०७११)/पुनर्वसन-०७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १३ ऑगस्ट, २०२६

वाचा -

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एफएलडी-२०२५/प्र.क्र.९१(ई-१३८९१४२)/पुनर्वसन-०७, दि. १७.११.२०२५

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एफएलडी-२०२५/प्र.क्र.७८(ई-१३२८६२६)/पुनर्वसन-०७, दि. १७.११.२०२५

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४९(ई-१६०३७०५)/पुनर्वसन-०७, दि. ३१.०३.२०२६

४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि. नांदेड यांचे पत्र जा.क्र./ काअ/ साबांवि/ दे/लेखा/१०५७/२०२६, दि. ३०.०४.२०२६

५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि. नांदेड यांचे पत्र जा.क्र./ काअ/ साबांवि/दे/लेखा/११६५/२०२६, दि. ०५.०५.२०२६

प्रस्तावना-

नांदेड जिल्ह्यातील बिलोली व देगलूर तालुक्यातील अतिवृष्टी/पुरामुळे बाधित होऊन पुनर्वसित झालेल्या गावांतील नागरी सुविधा कामांना संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांची देयके अदा करण्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि. नांदेड यांनी संदर्भाधीन क्र. ४ व ५ येथील पत्रान्वये निधी मागणी प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

२. त्यानुसार प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

नांदेड जिल्ह्यातील बिलोली व देगलूर तालुक्यातील अतिवृष्टी/पुरामुळे बाधित होऊन पुनर्वसित झालेल्या पुढील तक्त्यात नमूद गावांतील नागरी सुविधा कामांची देयके अदा करण्याकरिता एकूण रूपये १,२२,८८,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी बावीस लक्ष अठ्ठ्याऐंशी हजार फक्त) एवढा निधी सन २०२६-२०२७ या चालू वित्तीय वर्षात वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम लाखात)

अ. क्र.	पुनर्वसित गावठाण	नागरी सुविधा कामांचा तपशील	प्रशासकीय मान्यता रक्कम	यापूर्वी वितरित एकूण निधी	वितरित करावयाची रक्कम
ता. बिलोली, जि. नांदेड					
१	बोरगाव थडी	रामराव नालापल्ले यांचे घर ते मारोती नालापल्ले यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००

अ. क्र.	पुनर्वसित गावठाण	नागरी सुविधा कामांचा तपशील	प्रशासकीय मान्यता रक्कम	यापूर्वी वितरित एकूण निधी	वितरित करावयाची रक्कम
२	बोरगाव थडी	नागोराव सोंडारे यांचे घर ते लक्ष्मण सोंडारे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
३	बोरगाव थडी	गंगाधर सोंडारे यांचे घर ते अशोक सोंडारे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
४	बोरगाव थडी	अशोक सोंडारे यांचे घर ते भुजंग सोंडारे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
५	बोरगाव थडी	हिराकांत केरुरकर यांचे घर ते डी.पी. पर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
६	बोरगाव थडी	व्यंकट धर्मकारे यांचे घर ते सटवाजी धर्मकारे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
७	बोरगाव थडी	केरबा राखे यांचे घर ते संजय नालापल्ले यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
८	बोरगाव थडी	गंगाधर सोंडारे यांचे घर ते माधव नालापल्ले यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
९	बोरगाव थडी	पांडुरंग नालापल्ले यांचे घर ते बापुराव हाके यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
१०	बोरगाव थडी	बापुराव हाके यांचे घर ते शिवलिंग गोणगोपले याच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
११	बोरगाव थडी	शिवलिंग गोणगोपले यांचे घर ते माधव नालापल्ले यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
१२	बोरगाव थडी	खुशाल पाटील यांचे घर ते संजय नालापल्ले यांचे धरापर्यंत सी.सी. रस्ता करणे	१०.००	८.००	२.००
ता. देगलूर, जि. नांदेड					
१३	हावरगा	**अंतर्गत सी.सी. रस्ते व नाली बांधकाम**	९८.८८	निरंक	९८.८८
		एकूण			**१२२.८८**

२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र.२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७ एप्रिल २०१५ अनुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र.२७(२)(अ) अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारांनुसार नांदेड जिल्ह्यातील बिलोली व देगलूर तालुक्यातील अतिवृष्टी/पुरामुळे बाधित होऊन पुनर्वसित झालेल्या गावांतील नागरी सुविधा कामांकरिता रूपये १,२२,८८,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी बावीस लक्ष अठ्ठ्याऐंशी हजार फक्त) एवढा निधी "मागणी क्रमांक-सी ६, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०२, पूर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य (९३) इतर, (९३)(०५) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणी पुरवठा, शाळा, चावडी, विद्युत पुरवठा, नागरी सुविधावरील खर्च (अनिवार्य) (दत्तमत) (२२४५ ०९८८) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना पुढील परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद अटी/शर्तीच्या अधीन राहून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

३. सदर निधी खर्च करताना सर्व संबंधितांनी खालील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.

१) सदर निधी वितरणासाठी कक्ष अधिकारी (मदत-०३) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी सदर निधी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना BEAMS प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी त्यांना या आदेशान्वये प्राप्त होणारा निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि. नांदेड यांना कामांच्या प्रगतीनुसार अर्थसंकल्प वितरणप्रणाली BEAMS द्वारे तात्काळ वितरित करावा.

३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि. नांदेड यांनी या आदेशान्वये मंजूर केलेला निधी प्राप्त होताच नागरी सुविधा कामांची प्रलंबित देयके तात्काळ अदा करावीत, तद्नुषंगाने कार्यपूर्ती अहवाल शासन, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर तसेच जिल्हाधिकारी, नांदेड यांना सत्वर सादर करावा.

४) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला व प्राप्त झालेला निधी मंजूर नागरी सुविधा कामांवरच खर्च करण्यात यावा तसेच सदर निधी खर्च करताना मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत जास्त खर्च होणार नाही याची कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

५) मंजूर निधी शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय अन्य कामांवर खर्च होणार नाही याची संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी दक्षता घ्यावी .

६) संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावाधीन नागरी सुविधा सर्व दृष्टीने पूर्ण झाल्यावर संबंधित जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित कराव्यात व त्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांचेमार्फत शासनाच्या पुनर्वसन विभागास अवगत करावे.

७) सदरच्या आदेशातील नमूद लेखाशीर्षांतर्गत कोणताही निधी शिल्लक राहणार नाही अथवा सदर आदेशान्वये प्राप्त होणारा निधी संबंधित यंत्रणेच्या कोणत्याही Operational Bank Account/PLA (स्वीय प्रपंची खाते) मध्ये जमा करून ठेवण्यात येणार नाही, याची संबंधित यंत्रणेचे कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

८) सदरच्या आदेशातील नमूद लेखाशीर्षांतर्गत एक वर्षापूर्वीचे कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही, याची संबंधित यंत्रणेचे कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

९) सदरच्या आदेशातील नमूद लेखाशीर्षांतर्गत संबंधित संनियंत्रण अधिकारी यांनी होणाऱ्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवून शासनाच्या प्रचलित लेखा पध्दतीनुसार ते महालेखापाल यांना सादर करावेत. तद्नुषंगाने या लेखाशीर्षाखाली होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इत्यादि कामे संबंधितांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे करावीत.

१०) यासंदर्भातील खर्च विवरणपत्रे/अहवाल शासनास न चुकता सादर करण्यात यावीत. वरील निधी संबंधित खर्च ताळमेळाची विवरणपत्रे महालेखापाल कार्यालयाच्या Reconciliation Slip सह शासनास न चुकता सादर करावीत.

११) संबंधित अधीक्षक अभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता यांनी या आदेशान्वये वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) पुढील निधी मागणी प्रस्तावासोबत शासनास सादर करावे. तसेच सदर उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) महालेखापाल कार्यालय, संबंधित जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांनाही सादर करावे.

१२) या संदर्भातील लेखाशीर्षाखाली चालू वित्तीय वर्ष सन २०२६-२०२७ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने खर्चाचा विनियोजन लेखा संबंधितांनी विहित कालावधीत शासनास सादर करावा.

४. सदर आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३/विनिमय, भाग-२, दि. १७.०४.२०१५ मधील वित्तीय नियमावली भाग पहिला उपविभाग तीन परिच्छेद क्र.२७(२) अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारांनुसार व वित्त विभाग अनौ.सं.क्र. ३५३/२०२६/व्यय-९, दि.२९.०६.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०८१३१७१५०१६६४१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY MAROTI JAGTAP

Digitally signed by SANJAY MAROTI JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=9EA94B7D58FC204D63A497943E6C56976C537462D5F2964980C3090 6051D44D7, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2C1FC771D686D36A26A8AF979409826984378A73F9D4AEECA9 90209686CC25BD, cn=SANJAY MAROTI JAGTAP
Date: 2026.08.13 17:15:50 +05'30'

(संजय जगताप)
कार्यासन अधिकारी, मदत व पुनर्वसन विभाग

प्रत,

१) विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन), छत्रपती संभाजीनगर
२) उप आयुक्त (पुनर्वसन), छत्रपती संभाजीनगर
३) जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक, नांदेड
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२
६) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२
७) जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड
८) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
९) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि.नांदेड
१०) वित्त विभाग, कार्यासन व्यय-९, अर्थसंकल्प-६, मंत्रालय, मुंबई-३२.
११) महसूल व वन विभाग, कक्ष अधिकारी अर्थसंकल्प, मंत्रालय, मुंबई - ३२
१२) महसूल व वन विभाग, पी.ए.सी./ मदत-०३ कार्यासन, मंत्रालय, मुंबई ३२.
१३) निवडनस्ती कार्यासन पुनर्वसन-०७, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२